मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
दैनिक
# रयत समाचार
epaper.rayatsamachar.com
खिंचो न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक
• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४७७ वा • मंगळवार, ता. २३ डिसेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००




## आणि आम्ही करून दाखवलं
## अडथळ्यांवर मात करत इंडी जर्नलचा तिसरा कॉनक्लेव्ह दमदार उपस्थितीत यशस्वी

**पुणे | रयत समाचार**

**कन्क्लेव्हसाठी देशभरातून अनेक पत्रकार तसेच सीएसआरडी, न्यू आर्टस् कॉलेजचे पत्रकारीता अभ्यासक्रमाचे विद्यार्थी सहभागी झाले होते.**

जवळपास आठ फ्लाइट्स रद्द, त्याच दिवशी पियुष मिश्रा यांचा बहुचर्चित कॉन्सर्ट, अनेक महाविद्यालयांचे वर्धापन दिन सोहळे, पुणे बुक फेस्टिव्हलसारखी मोठी गर्दीची कार्यक्रमरांग आणि निवडणूक आयोगासाठी हॉल उपलब्ध करून देण्याची शक्यता. अशा अनेक अडथळ्यांच्या पार्श्वभूमीवरही इंडी जर्नलचा तिसरा कॉनक्लेव्ह सुमारे ३०० हून अधिक प्रतिनिधींच्या दमदार उपस्थितीत यशस्वीरित्या पार पडला, अशी माहिती प्रथमेश पाटील यांनी दिली. अधिक माहिती देताना पाटील म्हणाले, या परिषदेत शेती, लिंगभाव, पत्रकारांवर होणारी दडपशाही, भाषा, संघराज्य संबंध यांसह, पॅलेस्टिनच्या निमित्ताने सुरु असलेल्या मानवतेच्या कसोटीवर सखोल आणि व्यापक चर्चा झाली. समाजातील विविध स्तरांतील प्रश्नांना स्पर्श करत ही परिषद वैचारिकदृष्ट्या अत्यंत समृद्ध ठरली. इतकी गहन चर्चा, अनेक मान्यवरांची उपस्थिती असूनही मुख्य प्रवाहातील माध्यमांमध्ये या परिषदेबाबत अपेक्षित चर्चा न झाल्याची खंत व्यक्त करण्यात आली. मात्र, तक्रारींपेक्षा आपल्या कामावर विश्वास ठेवत पुढे जाण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला. या यशामागे राबलेले हात, डोळे तारवटून प्रवास करणारे स्वयंसेवक, पाहुण्यांची ये-जा सांभाळणारे कार्यकर्ते, पोस्टर-बॅनर, डिझाइन व छपाईची जबाबदारी सांभाळणारे, पासेस वाटप, भोजन व चहापाण्याची व्यवस्था पाहणारे सर्व जिवलग सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. कामगार चळवळी, छोट्या-छोट्या कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी संघटना, घरकामगार संघटना, शिक्षक आणि विविध संस्था यांनी थोडा-थोडा भार उचलत हा कॉनक्लेव्ह उभा राहण्यास हातभार लावला. ''आमच्यावर पुन्हा पुन्हा विश्वास ठेवणाऱ्या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत,'' अशी भावना यावेळी व्यक्त झाली. यावेळी कार्यक्रमाचे लाईव्ह प्रक्षेपण झाले नाही. मात्र, उच्च दर्जाच्या चित्रीकरणासह संपूर्ण कॉनक्लेव्ह लवकरच इंडी जर्नलच्या यूट्यूब चॅनलवर प्रसारित केला जाणार आहे, अशी माहिती प्रथमेश पाटील यांनी दिली.

# स्त्री मुक्ती परिषदेचा 'ठराव जाहीरनामा' प्रसिध्द
## समारोपानिमित्त मुंबईतील आझाद मैदानात भव्य सांस्कृतिक मेळावा

**मुंबई | गुरुदत्त वाकदेकर**



स्त्री मुक्ती परिषदेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित केलेल्या तीन दिवसीय राज्यस्तरीय परिषदेचा समारोप आज मोठ्या उत्साहात यशवंतराव चव्हाण सेंटर येथे पार पडला. या समारोपप्रसंगी स्त्री मुक्ती परिषदेचा सविस्तर 'ठराव जाहीरनामा' जाहीर करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेच्या अध्यक्ष शारदा साठे, डॉ. छाया दातार, डॉ. प्रज्ञा दया पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होत्या. या ठरावात महिला आयोगाची निष्क्रियता, जेन्डर बजेटची प्रभावी अंमलबजावणी, मनरेगामधील बदललेल्या कायद्याला विरोध आणि मनरेगाचा हक्क सोडणार नाही, हा ठाम निर्धार व्यक्त करण्यात आला. मुस्लिम महिलांचे प्रश्न, कामगारांचे प्रश्न, देशातील वाढता सांप्रदायिक हिंसाचार आणि सांप्रदायिक राजकीय वातावरणाचा मुकाबला करण्याची जबाबदारी, तसेच मनुस्मृती नको, संविधान हवे ही स्पष्ट भूमिका ठरावातून मांडण्यात आली. यासोबतच कौटुंबिक हिंसाचार, जातआधारित हिंसा व छळवणूक, क्वीअरट्रान्स लोकांचे प्रश्न, अपंग महिलांचे प्रश्न, महिलांना त्यांच्या गरजांनुसार आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, लैंगिक सेवा पुरविणाऱ्या लैंगिक श्रमिकांचे हक्क, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, नैसर्गिक संसाधनांवरील महिलांचा अधिकार, कचरावेचकांचे प्रश्न व कचरा व्यवस्थापन, तसेच प्रसार माध्यमे आणि समाज माध्यमांची भूमिका या मुद्द्यांवर सविस्तर भूमिका मांडण्यात आली. शालेय आणि विद्यापीठीय अभ्यासक्रमातून स्त्री चळवळीचा इतिहास व विचारांचा समावेश करावा, तसेच सांस्कृतिक जीवनात स्त्रियांच्या योगदानाची ओळख अधिक ठळकपणे निर्माण करावी, यावरही ठरावात भर देण्यात आला. परिषदेच्या समारोपानिमित्त मुंबईतील आझाद मैदानात भव्य सांस्कृतिक मेळावा आयोजित करण्यात आला होता. राज्याच्या विविध भागांतून आलेल्या महिला प्रतिनिधींनी कविता सादर केल्या, गाणी म्हटली आणि आपल्या अनुभवांना शब्द दिले. आदिवासी, मुस्लिम, कष्टकरी महिलांसह विविध समुदायांतील महिलांना मंचावर येऊन आपल्या विभागातील समस्या मांडण्याची संधी देण्यात आली. यावेळी एका महिलेने महत्त्वपूर्ण प्रस्ताव मांडला. आजही अनेक गावांमध्ये चावडीवर स्त्रियांना प्रवेश नाकारला जातो. या पार्श्वभूमीवर गावातील महिला आणि एलजीबीटीक्यूप्लस समुदायातील प्रतिनिधींना एकत्र घेऊन 'चावडी सावित्री फातिमाची' हा उपक्रम राबवावा, असा प्रस्ताव मांडण्यात आला. या उपक्रमांतर्गत चावडीवर किर्तन, भारूड, व्याख्यान किंवा चर्चा आयोजित करून सामाजिक बदलाचा संदेश देण्याची संकल्पना मांडण्यात आली असून, या उपक्रमाची सुरुवात येत्या ३ जानेवारीपासून करण्याचे आवाहन करण्यात आले. ही सुरुवात सावित्रीबाई फुले यांना दिलेली मानवंदना ठरेल, असे मत व्यक्त करण्यात आले. 'मिळून साऱ्या जणी' या मासिकाच्या प्रतिनिधींनी आपले मत व्यक्त करताना सांगितले की, समता प्रस्थापित करायची असेल तर ममता आवश्यक आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या मूल्यांवर आधारित व्यवस्था निर्माण करणे हेच स्त्री चळवळीचे अंतिम ध्येय असल्याचे त्यांनी नमूद केले. स्त्री मुक्ती चळवळीचे प्रतिनिधी सुरज पवार यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, गेल्या ५० वर्षांत स्त्री मुक्ती चळवळीने महत्त्वाचे कार्य केले आहे आणि पुढेही हे कार्य सुरू राहील. मात्र, खरी गरज पुरुषांना समानतेची भाषा समजावून सांगण्याची आहे. ही भाषा घराघरातून पोहोचली पाहिजे. स्त्री मुक्ती चळवळ ही पुरुषविरोधी नसून पितृसत्ताक व्यवस्थेविरोधात आहे. पुरुष म्हणजे मर्दांगी हा संकुचित विचार खोडून काढणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या ठराव जाहीरनाम्यातून स्त्री मुक्ती परिषदेने महिलांचे, कष्टकरी वर्गाचे आणि वंचित समुदायांचे प्रश्न ठामपणे मांडत आगामी काळातील संघर्षाची दिशा स्पष्ट केली असून, सामाजिक न्याय, समता आणि मानवी हक्कांसाठीचा लढा अधिक व्यापक करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे, अशी माहिती निशा शिवुरकर यांनी दिली.

# पाथर्डी नगरपरिषदेने जन्मास घातला आमदारकीचा उमेदवार...?
## शेवगाव-पाथर्डी विधानसभा मतदारसंघावर प्रत्यक्षाप्रत्यक्ष विखेंचेच वर्चस्व

**राजेंद्र देवढे | विशेष प्रतिनिधी**



पाथर्डी नगर परिषदेच्या निवडणुकीत, नगराध्यक्ष पदासाठी झालेल्या चुरशीच्या लढतीत अभय आव्हाड यांनी मोठा विजय मिळवत त्यांचे महत्व अधोरेखित केले आहे. पार्थ विद्या प्रसारक मंडळाच्या माध्यमातून हाती असलेली यंत्रणा, सर्व जातीधर्मांतील नागरिकांशी असलेले सलोख्याचे संबंध, मनमिळाऊ स्वभाव, अजातशत्रू व्यक्तिमत्व व विखे पाटील पिता-पुत्रांशी असलेले घनिष्ठ संबंध-या त्यांच्या जमेच्या बाजू आहेत. यापुर्वीही त्यांनी नगराध्यक्ष पद भूषविले असले तरी यावेळी ते थेट जनतेतून निवडून आल्याने त्यांच्या विजयाला वेगळेच आयाम प्राप्त झाले आहेत. त्यामुळे, त्यांच्याकडे मोठ्या अपेक्षेने पाहिले जात आहे. शेवगाव नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदी निवडून आलेल्या माया मुंडे यांचे पती अरुण मुंडे यांचीही विखे समर्थक म्हणून ओळख आहे. त्यामुळे, शेवगाव-पाथर्डी विधानसभा मतदारसंघात प्रत्यक्षाप्रत्यक्ष विखे पाटील यांचेच वर्चस्व प्रस्थापित झाले आहे. पाथर्डी-शेवगाव विधानसभा मतदारसंघाची पुनर्रचना झाल्यानंतर, शेवगांव-पाथर्डी हा नवा विधानसभा मतदारसंघ अस्तित्वात आला. पूर्वीच्या मतदारसंघात पाथर्डी तालुक्यातील संपूर्ण गावांसह, शेवगाव तालुक्याच्या पूर्व भागातील ३२ गावांचा समावेश होता, तर नव्याने अस्तित्वात आलेल्या पुनर्रचित मतदारसंघात शेवगाव तालुक्यातील संपूर्ण गावांसह पाथर्डी तालुक्यातील तीन जिल्हा परिषद गटांचा समावेश आहे. पुर्वीच्या म्हणजेच पाथर्डी-शेवगाव विधानसभा मतदारसंघातून, अभय आव्हाड यांचे वडील स्वर्गीय नारायणराव गणपतराव आव्हाड उर्फ बाबुजी आव्हाड-हे १९५७ साली अपक्ष आमदार झाले होते. त्यानंतर १९६२ साली ते परत भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने आमदार म्हणून निवडून आले होते. १९५७ ते १९६७ असे दहा वर्षे त्यांनी या मतदासंघाचे विधानसभेत प्रतिनिधीत्व केले होते. भारदस्त व्यक्तिमत्व व फर्डे वकृत्व या त्यांच्या जमेच्या बाजू होत्या. त्याकाळी, राजकारणात साधनशुचितेला अनन्यसाधारण महत्व होते. बाबुजी आव्हाड यांच्या व्यक्तिमत्त्वात ती ठासून भरली होतीच, शिवाय साधनचतुष्टय- अर्थात वस्तुविवेक, वैराग्य, शमादी (यांत शम, दम, दया, तितिक्षा, उपरती व समाधान यांचा अंतर्भाव होतो) व मुमुक्षुत्व हे अलौकिक गुणही त्यांच्या अंगी असल्याने, त्यांचे व्यक्तिमत्व बहुआयामी होते. बाबुजी आव्हाड यांची कारकीर्द संपुष्टात आल्यानंतर स्वर्गीय बाळासाहेब भारदे, गणपत राजाराम उर्फ रावसाहेब म्हस्के, स्वर्गीय बबनराव ढाकणे, आप्पासाहेब राजळे, स्वर्गीय दगडू पाटील बडे व राजीव राजळे यांनी याच मतदारसंघाचे विधानसभेत प्रतिनिधीत्व केले. या मतदारसंघाच्या प्रथम आमदाराचा बहुमान स्वर्गीय माधवराव निऱ्हाळी यांना मिळाला होता. अल्पसंख्याक म्हणजेच कोष्टी समाजातून निवडून गेलेले ते एकमेव आमदार होत. त्यानंतर अस्तित्वात आलेल्या शेवगाव-पाथर्डी या मतदारसंघाच्या प्रथम आमदारकीचा बहुमान चंद्रशेखर घुले पाटील यांच्याकडे जातो. चंद्रशेखर घुले पाटील यांची एक टर्म वगळता, विद्यमान आमदार मोनिका राजळे या तिसऱ्यांदा या मतदासंघाचे विधानसभेत प्रतिनिधीत्व करत आहेत. त्यांनी अनुक्रमे चंद्रशेखर घुले पाटील व ॲड. प्रताप ढाकणे यांचा तब्बल दोनदा दारुण पराभव केला आहे. घुले-ढाकणे यांच्या व्यतिरिक्त त्यांचा वारू रोखण्यास सक्षम उमेदवार आजवर दृष्टीपथात नव्हता. अर्जुन शिरसाठ व अभय आव्हाड यांच्या अंगी ती क्षमता व गुणवत्ता असल्याची भावना जनमानसांत असली तरी त्यांनी कधीही ते धाडस केले नाही. विधानसभेची निवडणूक लढण्यासाठी आवश्यक असलेली साधने त्यांच्याकडे नसल्याने त्यांनी तसा प्रयत्न केला नसावा-असं बोललं जात आहे. विद्यमान आमदार मोनिका राजळे यांनी या मतदारसंघातून तीनदा विजय मिळवल्याने भाजपाच्या दरबारात त्यांचे महत्व वाढीस लागले आहे. महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळाच्या आगामी विस्तारात त्या मंत्रीही होऊ शकतात. अहिल्यानगर जिल्ह्यात त्यांच्या रुपाने दूसरा तुल्यबळ धृव निर्माण झाल्याने, विखे पाटील पिता-पुत्रांना समानांतर राजकीय प्रतिस्पर्धी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. त्यांना रोखण्यासाठी आजवर विखे पाटील पिता-पुत्रांना नाल सापडला होता पण घोडा मिळत नव्हता. अभय आव्हाड यांच्या रुपात त्यांना घोडाही उपलब्ध झाल्याने ते आव्हाड यांच्यावर शर्यत लावू शकतात. थेट जनतेतून नगराध्यक्षपदी निवडून आल्याने अभय आव्हाड यांच्या विजयाला वेगळीच झळाळी प्राप्त झाली आहे. त्यांचे वडील स्वर्गीय बाबुजी आव्हाड यांना जवळून पाहिलेली एक पिढी अजूनही अस्तित्वात आहे. अभय आव्हाड यांना त्यांचा वारसा उपजतच लाभला आहे. पार्थ विद्या प्रसारक मंडळाच्या माध्यमातून या तालुक्यातील जवळपास दोन पिढ्यांनी शिक्षण घेतले असल्याने, प्रत्येक गावांत त्यांना ओळखणारे लोक आहेत. विखे पाटील घराण्यातील प्रत्येक पिढीची महत्वाकांक्षा जगजाहिर आहे. पक्षांतर्गत विरोधकांची उंची कमी करण्यासाठी आवश्यक असलेले साधन अभय आव्हाड यांच्या रुपात त्यांच्या हाताशी आले आहे. त्यामुळेच पाथर्डी नगर परिषदेच्या निवडणुकीने नवा भिडू जन्मास घातला आहे, असे म्हणण्यास भरपूर वाव आहे.

# भावी पिढी घडवण्याचे काम शिक्षकांबरोबर पालकांचेही- खा. शेट्टर

**बेळगाव | श्रीकांत काकतीकर**



अलीकडच्या काळात पालकांच्या मुलांबद्दलच्या अपेक्षा वाढल्या असून, याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. पालकांनी मुलांना त्यांच्या भावी जीवनाच्या वाटा चोखाळण्याचे स्वातंत्र्य द्यावे. भावी पिढी घडवण्याचे काम केवळ शिक्षकांचेच नव्हे, तर पालकांचेही तितकेच महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री तथा बेळगावचे विद्यमान खासदार जगदीश शेट्टर यांनी केले. कॅम्प येथील बी. के. मॉडल हायस्कूलच्या शतक महोत्सव कार्यक्रमात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी डॉ. गुरुराज करजगी हेही प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. आपल्या भाषणात खासदार शेट्टर म्हणाले की, बी. के. मॉडल हायस्कूलच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता सामाजिक जाणिवाही दिल्या आहेत. संस्कृती व परंपरा जपण्याचे काम या शाळेने केले असून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याची महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या आत्मविश्वासामुळेच या शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या भावी जीवनात भरीव प्रगती साधली आहे. ते पुढे म्हणाले की, शिक्षकांबरोबरच पालकांनीही मुलांच्या आवडीनिवडीचा विचार करणे आवश्यक आहे. पालकांनी आपल्या अपेक्षा मुलांवर लादू नयेत. शिक्षक व पालकांनी मिळून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वासासोबतच राष्ट्राभिमान जागृत करण्याचे कार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी बोलताना डॉ. गुरुराज करजगी म्हणाले की, आजची पिढी मोबाईल व लॅपटॉपसारख्या निर्जीव साधनांमध्ये अधिक गुंतली. यामुळे नातेसंबंधांमध्ये दुरावा वाढत असून मुलांची मानसिकता बदलत चालली आहे. पुस्तकी ज्ञानाचा तमाशा होत असून अनेक ठिकाणी शिक्षक केवळ नोकरी म्हणून अध्यापन करत आहेत. परिणामी शिक्षणाचा दर्जा खालावत आहे. या परिस्थितीचा गंभीरपणे विचार करण्याची गरज असून शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडे आपल्या मुलांप्रमाणे पाहून अध्यापन करावे. तसेच पालकांनीही शिक्षकांशी सातत्याने संवाद ठेवावा, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमात श्रीनिवास शिवणगी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. संस्थेचे अध्यक्ष अविनाश पोतदार यांनी मान्यवरांचा सत्कार केला. कार्यक्रमाच्या शेवटी बी. के. मॉडल हायस्कूल, श्रीधर कुलकर्णी उषाताई गुप्ते हायस्कूल तसेच प्रभाकर शहापूरकर यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली.

# 'महाबीझ २०२६' जागतिक व्यवसाय संधी; उद्योजकांना मार्गदर्शन
## बीबीएन ग्लोबलकडून व्यवसाय संवाद बैठक

**छत्रपती संभाजीनगर | राम कोंडीलकर**




बीबीएन ग्लोबलतर्फे संभाजीनगर येथे उद्योजकांसाठी व्यवसाय संवाद बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी दुबई येथे ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या 'महाबीझ २०२६' या आंतरराष्ट्रीय व्यवसाय परिषदेबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. या परिषदेमुळे महाराष्ट्र व मराठवाड्यातील उद्योजकांना निर्यातआयात, गुंतवणूक, आंतरराष्ट्रीय भागीदारी तसेच जागतिक नेटवर्किंगच्या विविध संधी उपलब्ध होणार असल्याचे जीएमबीएफ ग्लोबलच्या सदस्या प्रचिती तलाठी यांनी सांगितले.

या बैठकीस गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरमचे सदस्य दिलीप खेडेकर उपस्थित होते. महाराष्ट्रातील उद्योजकांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठांशी जोडण्यासाठी अशा संवादात्मक उपक्रमांचे महत्त्व त्यांनी यावेळी अधोरेखित केले. बैठकीत प्रचिती तलाठी यांनी जीएमबीएफ ग्लोबल ही दुबईस्थित, ना-नफा व्यवसाय संघटना असून ती महाराष्ट्रातील उद्योजकांना दुबई, जीसीसी, मध्यपूर्व, आफ्रिका तसेच इतर जागतिक बाजारपेठांमध्ये व्यवसाय विस्तारासाठी संधी उपलब्ध करून देत असल्याचे स्पष्ट केले. महाबीझ २०२६ हि दुबई येथे आयोजित करण्यात येणारी द्वैवार्षिक जागतिक व्यवसाय परिषद असून या परिषदेत पंधराहून अधिक देशांतील सुमारे ८०० ते १००० प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. या प्रतिनिधींमध्ये उद्योजक, गुंतवणूकदार, उद्योग संघटना, निर्यातदार, सेवा क्षेत्रातील व्यावसायिक तसेच स्टार्टअप्सचा समावेश असणार आहे. संभाजीनगर व मराठवाडा विभागातील उद्योजकांसाठी 'महाबीझ २०२६'मधून दुबई व जागतिक बाजारपेठेत निर्यातआयात व व्यवसाय विस्ताराच्या संधी, जॉइंट व्हेंचर व आंतरराष्ट्रीय भागीदारी, गुंतवणूकदारांशी थेट संपर्क, जागतिक नेटवर्किंगद्वारे नवीन ग्राहक व व्यवसाय करार तसेच स्थानिक उद्योगांना आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळण्याची संधी उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले. योग्य व्यासपीठ, मार्गदर्शन व नेटवर्क उपलब्ध झाल्यास संभाजीनगरसारख्या शहरांतील उद्योजकही जागतिक पातळीवर यशस्वी होऊ शकतात, असे मत त्यांनी व्यक्त केले.

बैठकीदरम्यान उपस्थित उद्योजकांनी दुबईतील उद्योग वातावरण, स्टार्टअप संधी, व्यापार धोरणे व गुंतवणूक प्रक्रियेबाबत प्रश्न विचारले. या संवादातून जागतिक व्यवसाय विस्तारासाठी आवश्यक माहिती व प्रेरणा मिळाल्याचे उपस्थितांनी सांगितले. ही बैठक माहितीपूर्ण, प्रेरणादायी व भविष्यातील आंतरराष्ट्रीय सहकार्यासाठी दिशादर्शक ठरल्याचे बीबीएनजीचे श्रीधर कुलकर्णी यांनी नमूद केले. बैठक यशस्वी होण्यासाठी श्रीधर कुलकर्णी, सुजित पोतदार व अतुल ठाकूर यांचे सहकार्य लाभले.



# लोकशाही उत्सव

## अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक - २०२५-२६



# जनकौल आणि महानगरांची निर्णायक कसोटी

महाराष्ट्रातील नगर पंचायत आणि नगरपालिका निवडणुकांचे २१ डिसेंबर २०२५ रोजी जाहीर झालेले निकाल फक्त स्थानिक स्वराज्य संस्थांची सत्ता समजून घेण्याचे साधन नाहीत; ते ग्रामीण व निमशहरी मतदारांनी दिलेले लोकशाहीचे ठाम, जागरूक आणि स्पष्ट विधान आहेत. यातून मतदारांचा बदललेला स्वभाव स्पष्ट दिसतो, सत्ता फक्त सवयीची नको, ती परिणामकारक, उत्तरदायी आणि दैनंदिन जीवनाला थेट स्पर्श करणारी हवी. हा कौल केवळ निवडणुकीचा निकाल नसून, प्रशासनाला दिलेला अंतिम इशारा आहे. ग्रामीण महाराष्ट्रातून उमटलेला कौल काही महत्त्वाचे संदेश ठळकपणे अधोरेखित करतो. मतदार आता फक्त घोषणा किंवा ओळखीच्या चेहऱ्यांवर विश्वास ठेवत नाहीत. पाणी, वीज, रस्ते, आरोग्य, शिक्षण, रोजगार, महागाई, सार्वजनिक सुविधा आणि स्थानिक प्रशासनाची कार्यक्षमता हेच आज निर्णयाचे खरे निकष ठरत आहेत. काही ठिकाणी सत्ताधाऱ्यांविरोधातील नाराजी, काही ठिकाणी सत्ताबदल, तर काही ठिकाणी नव्या नेतृत्वाला दिलेली संधी हे स्पष्ट करतात की, मतदार आता प्रत्यक्ष काम पाहतो आणि त्यावर न्याय्य निर्णय देतो. काही ठिकाणी दीर्घकाळ सत्तेत असलेली समीकरणे मतदारांनी क्षणार्धात बदलून टाकली, हे या बदललेल्या मानसिकतेचे ठळक उदाहरण ठरते. महाराष्ट्रातील २९ महानगरपालिका केवळ वॉटरगटरमीटर व्यवस्थापन करणारी यंत्रणा नाहीत; त्या शहराच्या आत्म्याची आणि भविष्यास दिशा देणाऱ्या संस्थाही आहेत. मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर, नाशिक, कोल्हापूर, सोलापूर, भिवंडी-निजामपूर, पिंपरी-चिंचवड, नवी मुंबई, वसई-विरार, कल्याण-डोंबिवली, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, लातूर, नांदेड-वाघाळा, मालेगाव, मीरा-भाईंदर, सांगली-मीरज-कुपवाड, पनवेल, अमरावती, इचलकरंजी, अकोला आणि अहिल्यानगर या शहरांतून राज्याच्या अर्थचक्राची इंजिने सातत्याने चालत असतात. वाढती महागाई, घरकुलांच्या वाढत्या किंमती, वाहतूक कोंडी, प्रदूषण, पर्यावरणाचा ऱ्हास, झोपडपट्ट्यांतील समस्या आणि असमान विकास यांनी शहरी जीवन अधिक गुंतागुंतीचे आणि तणावग्रस्त केले आहे. दीर्घकाळ चाललेल्या प्रशासक कारभारामुळे लोकप्रतिनिधींच्या अभावात नागरिकांचा थेट सहभाग मर्यादित झाला असून उत्तरदायित्वाची धार बोथट झाली आहे. त्यामुळे येणाऱ्या महानगरपालिका निवडणुका फक्त सत्ता हस्तांतरणापुरत्या मर्यादित न राहता, लोकप्रतिनिधींच्या पुनरागमनासाठी आणि लोकशाहीच्या पुनर्स्थापनेसाठी नागरिकांनी व्यक्त केलेली ठाम मागणी ठरणार आहेत. १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या महानगरपालिका निवडणुका काही ठळक आणि परस्परपूरक प्रवाह स्पष्टपणे दर्शवतात. कामगिरीवर आधारित मतदान हा कळीचा मुद्दा ठरत असून, केवळ प्रचाराच्या जोरावर संधी मिळणे आता अशक्य होत चालले आहे. स्थानिक, पारदर्शक, सहज उपलब्ध आणि विश्वासार्ह नेतृत्वाला मतदार प्राधान्य देताना दिसतात. महिला आणि तरुण मतदार सुरक्षितता, सार्वजनिक सुविधा, रोजगार, शिक्षण व आरोग्य या प्रश्नांवर निर्णायक भूमिका घेत आहेत. शहरी मध्यमवर्ग घरकुल, वाहतूक, महागाई आणि एकूणच जीवनमानाशी निगडित प्रश्नांवर उघड नाराजी व्यक्त करत आहे. त्याचवेळी पूर, उष्णतेच्या लाटा, पाणीटंचाई, कचरा व्यवस्थापन आणि प्रदूषण यांसारख्या पर्यावरणीय व आपत्ती व्यवस्थापनाच्या मुद्द्यांनाही मतदार गंभीरतेने घेत आहेत. डिजिटल व सोशल मिडियामुळे प्रचार अधिक प्रभावी झाला असला, तरी प्रत्यक्ष कामाचे मूल्यमापन मतदार स्वतः करीत आहेत. हे सर्व प्रवाह परस्परांपासून वेगळे नसून, शहरी मतदाराच्या वाढत्या अपेक्षा, जागरूकता आणि उत्तरदायित्वाच्या मागणीचे प्रतिबिंब आहेत. ग्रामीण भागात मतदान प्रामुख्याने स्थानिक प्रशासनाची कार्यक्षमता, पाणीपुरवठा, वीज आणि आरोग्य सुविधांभोवती केंद्रित असते. त्याउलट शहरी भागात आर्थिक स्थैर्य, जीवनमान, सार्वजनिक सेवा, घरकुल आणि वाहतूक व्यवस्था हे निर्णायक मुद्दे ठरतात. ही तुलना राज्यातील बदलत्या सामाजिकराजकीय वास्तवाचे स्पष्ट चित्र उभे करते. राज्यातील प्रमुख १० महानगरपालिकांमध्ये नागरिकांच्या प्रश्नांचे स्वरूप ठळकपणे वेगवेगळे दिसते. बृहन्मुंबईत वाहतूक, पाणीपुरवठा आणि कचरा व्यवस्थापन आघाडीवर आहेत; पुण्यात सार्वजनिक वाहतूक आणि शिक्षण सुविधा महत्त्वाच्या ठरतात; ठाण्यात पाणीटंचाई आणि वाहतूक कोंडी हे कळीचे प्रश्न आहेत; नागपुरात औद्योगिक वाढीसोबत वाढते प्रदूषण चिंतेचा विषय आहे; नाशिकमध्ये पाणी, महागाई आणि रस्त्यांची अवस्था चर्चेत आहे; कोल्हापुरात सांडपाणी आणि सार्वजनिक सुविधांचा प्रश्न केंद्रस्थानी आहे; सोलापुरात कचरा व्यवस्थापन आणि पाणीपुरवठा महत्त्वाचा ठरतो; नवी मुंबईत वाहतूक आणि पर्यावरण व्यवस्थापन महत्त्वाचे मुद्दे आहेत; वसईविरारमध्ये झोपडपट्ट्या, पाणी आणि सार्वजनिक सेवा गंभीर प्रश्न आहेत; तर पिंपरीचिंचवडमध्ये उद्योग, वाहतूक आणि घरकुल हे मुद्दे निर्णायक ठरत आहेत. इतर महानगरपालिकांमध्येही मतदानाची दिशा प्रामुख्याने कामगिरी, नेतृत्व आणि पारदर्शक कारभाराभोवतीच फिरताना दिसते हीच बाब भविष्यातील शहरी राजकारणाला व्यक्तिकेंद्रिततेकडून उत्तरदायित्वकेंद्रिततेकडे नेणारी निर्णायक वळणरेषा ठरत आहे. लोकशाही ही केवळ मतदानाची एकदिवसीय प्रक्रिया नसून, ती सतत चालणारी संवादयात्रा आहे. ग्रामीण महाराष्ट्राने आपल्या अपेक्षा आणि भूमिका स्पष्टपणे मांडल्या आहेत; आता शहरी मतदारांची वेळ आहे. शहरे फक्त सिमेंट आणि डांबरावर उभी नसतात; ती उभी असतात नागरिकांच्या स्वप्नांवर, अपेक्षांवर आणि न्यायाच्या भावनेवर. ही स्वप्ने जेव्हा मतपेटीत उतरतात, तेव्हा फक्त सत्ता बदलत नाह, राजकीय संस्कृती बदलते, प्रशासनाची जबाबदारी निश्चित होते आणि लोकशाहीची नाडी अधिक ठामपणे धडधडू लागते. १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या २९ महानगरपालिका निवडणुका महाराष्ट्राच्या राजकारणावर निर्णायक परिणाम करणाऱ्या ठरणार आहेत. कामगिरी, स्थानिक नेतृत्व आणि पारदर्शक कारभार हेच मतदानाचे मुख्य निकष असतील. महिला, तरुण आणि मध्यमवर्गीय मतदारांची भूमिका विशेष महत्त्वाची ठरणार आहे. या निवडणुकांचे निकाल केवळ स्थानिक सत्तासमीकरणे बदलणार नाहीत, तर राज्याच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक प्रवाहांनाही दिशा देतील सत्ताधाऱ्यांसाठी आत्मपरीक्षणाची आणि विरोधकांसाठी जबाबदारी स्वीकारण्याची ही वेळ असेल. या निवडणुकांकडे दुर्लक्ष करणाऱ्या राजकीय शक्तींना या कौलाचे पडसाद पुढील विधानसभा राजकारणात उमटताना दिसल्याशिवाय राहणार नाहीत.



गुरुदत्त वाकदेकर
९९८७७४६७७६

लोकोत्सव

(लेखक रयत समाचारचे मुंबई विशेष प्रतिनिधी आहेत)

# काँग्रेस विजयासाठी एकजूट- बाळासाहेब थोरात

## मनपातही होणार ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉकच्या सिंहचा प्रयोग?

**अहमदनगर । रयत समाचार**

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर येथे उपस्थित राहून इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेऊन त्यांच्याशी सविस्तर संवाद साधल्याची माहिती बाळासाहेब थोरात यांनी दिली. ते पुढे म्हणाले की, आगामी महानगरपालिका निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा विजय निश्चित करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करावे, असा ठाम निर्धार या बैठकीत करण्यात आला.

''महानगरपालिकेवर काँग्रेसचा झेंडा फडकविणे हेच आपले लक्ष्य आहे,'' असेही त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीस आमदार हेमंत ओगले, अहिल्यानगर काँग्रेसचे प्रभारी शरद आहेर, शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष दिप चव्हाण, जिल्हा ग्रामीण काँग्रेसचे अध्यक्ष सचिन गुजर यांच्यासह काँग्रेसचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, संगमनेर नगरपरिषदेत थोराततांबे यांनी थेट नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी स्थापन केलेल्या ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक या पक्षाच्या सिंह चिन्हावर निवडणूक जिंकत राजकीय प्रयोग यशस्वी केला.

हा प्रयोग अहिल्यानगर महानगरपालिकेत बाळासाहेब थोरात करतील का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. संगमनेरसारखा सिंहचा प्रयोग येथेही झाल्यास काँग्रेसचा पारंपरिक 'पंजा' मनपाच्या राजकारणातून हद्दपार होण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. त्यामुळे येणारा काळ अहिल्यानगरच्या राजकारणासाठी निर्णायक ठरणार आहे.



# रा.स्व. संघाच्या भाजपाचे असंतुष्ट किशोर डागवाले राष्ट्रवादी अपच्या गळाला

## ओबीसी चेहऱ्याचा प्रवेश निश्चित

**अहमदनगर । रयत समाचार**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अहिल्यानगरमध्ये इनकमिंगला वेग आला. रा.स्व.संघाच्या भारतीय जनता पार्टीच्या ओबीसी आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष तसेच माजी स्थायी समिती सभापती किशोर डागवाले हे राष्ट्रवादी काँग्रेस अपमध्ये जाहीर प्रवेश करणार आहेत. यानिमित्त पटवर्धन चौक येथे भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमाला आ. संग्राम जगताप यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. शहराच्या राजकारणात या प्रवेशामुळे मोठी हालचाल निर्माण झाली आहे. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी एमआयडीसी परिसरात सक्रिय असलेले स्क्रॅप उद्योजक लिंबाशेट नागरगोजे यांनीही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यामुळे नगरमध्ये राष्ट्रवादी अपची संघटनात्मक ताकद वाढत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. याच पार्श्वभूमीवर, पुण्यात भारतीय जनता पार्टीने राष्ट्रवादी काँग्रेसचे २२ नगरसेवक आपल्या पक्षात घेतल्यानंतर अजित पवार यांनी सूचक प्रतिक्रिया देत म्हटले होते, ''एकाने सुरू केले, तर दुसरे गप्प बसणार नाहीत.'' आता त्या वक्तव्याचा प्रत्यय येत असून, राष्ट्रवादी काँग्रेसकडूनही भाजपच्या असंतुष्ट पदाधिकाऱ्यांना पक्षात प्रवेश देण्यास सुरुवात झाल्याचे दिसत आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा राजकीय प्रवाह अधिक महत्त्वाचा मानला जात आहे.




# ओबीसी उमेदवारांना प्राधान्य द्यावे- गणेश विद्ये

**अहमदनगर । रयत समाचार**

भाजपाच्या ओबीसी विभागाची शहरस्तरीय बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत येणाऱ्या २०२६ च्या अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकीत ओबीसी समाजातील जास्तीत जास्त उमेदवारांना भारतीय जनता पार्टीकडून उमेदवारी देण्यात यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली. ही माहिती भाजप ओबीसी शहर-जिल्हाध्यक्ष गणेश विद्ये यांनी दिली. बैठकीदरम्यान चर्चा करताना गणेश विद्ये यांनी सांगितले की, अहिल्यानगर महानगरपालिकेतील एकूण १७ प्रभागांमध्ये ओबीसी समाजातील उमेदवार इच्छुक असून ते निवडून येण्यास सक्षम आहेत. अलीकडेच महाराष्ट्रात झालेल्या नगरपंचायत व नगरपालिका निवडणुकांमध्ये ओबीसी समाजाने मोठ्या प्रमाणात महायुतीच्या पाठीशी उभे राहत मतदान केले.



यामुळे राज्यात महायुतीचे अनेक उमेदवार विजयी झाले आहेत. अहिल्यानगर शहरात ओबीसी समाजाची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असून या समाजातील अनेक कार्यकर्ते भाजपामध्ये सक्रियपणे काम करत आहेत. त्यामुळे येणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीत ओबीसी समाजाला योग्य प्रतिनिधित्व देणे ही काळाची गरज असल्याचेही विद्ये यांनी स्पष्ट केले. यावेळी बैठकीत भाजप ओबीसी विभागाचे पदाधिकारी कुंडलिक गदादे, अ‍ॅड. राजू गाली, रोहित पठारे, विनोद बोगा व स्वाती शिरसुल यांनी आपले मनोगत व्यक्त करत महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने जास्तीत जास्त ओबीसी समाजातील उमेदवारांना उमेदवारी द्यावी, अशी मागणी केली. या बैठकीस सचिन पळशीकर, श्रीकांत फंड, सुनिता कुरापट्टी, जितेंद्र बिज्जा, अभय मड्डूर, लक्ष्मण पालवे, सचिन पालवे, संदीप शहापूरकर, सोमनाथ आव्हाड, सुजित हराळे व सुरेश लोळगे आदी उपस्थित होते.

# तक्रार निवारण, आचारसंहिता नियंत्रण कक्षाचा दूरध्वनी क्रमांक जाहीर

**अहमदनगर । रयत समाचार**

राज्य निवडणूक आयोगाने अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्याने महानगरपालिका क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली. निवडणूक काळात आचारसंहितेचे उल्लंघन होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत असून त्याच अनुषंगाने नागरिकांना तक्रार नोंदविता यावी, यासाठी आचारसंहिता कक्ष स्थापन करण्यात आला. या कक्षासाठी उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी तथा आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली. अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील सभागृह नेता यांच्या दालनात हा आचारसंहिता कक्ष कार्यरत करण्यात आला आहे. या कक्षाच्या प्रमुख म्हणून उपजिल्हाधिकारी सायली अशोक सोळंके मो. ७०३८१७२७८५ यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांना सहाय्यक म्हणून नगररचना विभागाचे रचना सहाय्यक जितेंद्र शेळके मो. ९९२२७७७११६, अतिक्रमण निर्मूलन विभाग प्रमुख आदित्य बल्लाळ मो. ९५६१००४६१८ तसेच क्षेत्रीय अधिकारी रिझवान शेख मो. ९८२२६५२७८२ यांची नियुक्ती करण्यात आली. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून आचारसंहिता लागू झाली असून निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत ती अंमलात राहील. आचारसंहिता महानगरपालिकेच्या संपूर्ण क्षेत्रात लागू राहील. या कालावधीत मतदारांना प्रलोभन देणारी कोणतीही कृती किंवा घोषणा कोणत्याही मंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक, इतर पदाधिकारी तसेच शासनाच्या कोणत्याही विभागाकडून करता येणार नाही, असे राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. महानगरपालिका क्षेत्रात आदर्श आचारसंहितेची कठोर अंमलबजावणी करण्यात येणार असून, आचारसंहिता उल्लंघनाबाबत तक्रार असल्यास नागरिकांनी ०२४१२३२३१४३ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे.




हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

# 'व्ही.बी. जी. राम जी' विधेयकाविरोधात जोरदार निदर्शने



**शेवगाव । रयत समाचार**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (मनरेगा) रद्द करून त्याऐवजी नवीन 'व्ही.बी. जी. राम जी' विधेयक आणण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाचा भारतीय कम्युनिस्ट पक्षाने तीव्र शब्दांत निषेध केला. या निर्णयाच्या विरोधात भारतीय कम्युनिस्ट पक्ष व महाराष्ट्र राज्य लाल बावटा शेतमजूर युनियनच्या वतीने काल शेवगाव तहसील कार्यालयावर जोरदार घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली. यावेळी तहसीलदार आकाश दहाडदे यांना निवेदन देण्यात आले. मनरेगामधून महात्मा गांधींचे नाव जाणीवपूर्वक काढून टाकणे ही केवळ प्रशासकीय बाब नसून गांधीजींच्या मूल्यांप्रती असलेला भाजपाचा तिरस्कार दर्शवणारी व फॅसिस्ट विचारधारेतून प्रेरित कृती आहे. हक्काधारित असलेला हा कायदा मोडीत काढून तो अधिकाराधीन योजनेत रूपांतरित करण्याचा सरकारचा डाव म्हणजे ग्रामीण कामगारांच्या रोजगार हमीच्या संकल्पनेलाच सुरुंग लावण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप करण्यात आला. यामुळे मजुरांना अधिकाऱ्यांच्या व कंत्राटदारांच्या दयेवर सोडले जाणार आहे. नवीन विधेयकामुळे आर्थिक भारातील ४० टक्के हिस्सा राज्य सरकारांवर टाकण्यात येत आहे. चुकीची जीएसटी रचना, केंद्र सरकारची उदासीनता व राजकीय सूडबुद्धीमुळे राज्ये आधीच आर्थिक तणावात असताना असा निर्णय अत्यंत अन्यायकारक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. व्यापक सल्लामसलत न करता तसेच वेतनवाढ व हमखास कामाच्या दिवसांबाबत स्पष्ट भूमिका न घेता असा बदल करणे घटनाबाह्य असल्याचा आरोपही करण्यात आला. त्यामुळे हा कामगारविरोधी निर्णय देशभरातील कामगार, शेतकरी व लोकशाही शक्ती एकत्र येऊन परतवून लावतील, असा इशाराही देण्यात आला. या आंदोलनात भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे तालुका सेक्रेटरी कॉ. संदीप इथापे, भगवानराव गायकवाड, अशोक नजन, ॲड. विनायकराव आहेर, ॲड. गणेश ताठे, ॲड. भगचंद उकिरडे, विष्णू गोरे, भिवसेन घोरपडे, अंजाबापू गायकवाड, दत्तात्रय आरे, मच्छिंद्र आरले, विष्णू चव्हाण, आसाराम काटे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**डाव्या पक्षांच्या पाठिंब्याने यूपीए सरकारने लागू केलेला मनरेगा हा भारताच्या प्रजासत्ताक इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा असून 'कामाचा हक्क' या घटनात्मक संकल्पनेचा कणा आहे. या कायद्यामुळे ग्रामीण भागात किमान वेतनाची हमी निर्माण झाली आहे. प्रस्तावित विधेयकात कामाचे दिवस १२५ करण्याचा दावा करण्यात येत असला, तरी मागणीआधारित स्वरूपच काढून टाकल्यास कामगारांचा रोजगार मागण्याचा हक्क हिरावला जाणार आहे.**

**कॉ. ॲड. सुभाष लांडे,** राज्य सेक्रेटरी, भाकप



## नागापूर-कर्जुनेखारे रस्तादुरुस्ती सुरू

# युवकांच्या पाठपुराव्याला यश

**नगर तालुका । रयत समाचार**

नागापूर, निंबळक, इसळक व कर्जुनेखारे या महत्त्वाच्या जोडरस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी परिसरातील युवकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर अखेर सदर रस्त्याच्या पॅचिंगचे काम सुरू करण्यात आले. या रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अनेक लहान-मोठे अपघात घडत असून वाहनचालक व पादचाऱ्यांचे जीव धोक्यात आले होते. याबाबत कर्जुनेखारेचे माजी उपसरपंच अंकुश शेळके, युवानेते महेश म्हस्के यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडे निवेदनाद्वारे रस्ता दुरुस्तीची मागणी केली होती. त्यांनी १८ नोव्हेंबर रोजी रस्त्याच्या दुरवस्थेबाबत अधिकृत तक्रार दाखल करून तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली होती. मात्र, बराच कालावधी लोटूनही काम सुरू न झाल्याने त्यांनी प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा केला. तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला. या इशाऱ्याची गंभीर दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाने अखेर रस्तादुरुस्तीचे काम हाती घेतले असून सध्या रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी पॅचिंगचे काम सुरू आहे. या कामामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. दरम्यान, सुरू असलेल्या पॅचिंग कामाची पाहणी माजी उपसरपंच अंकुश रावसाहेब शेळके यांनी केली. यावेळी निंबळक ग्रामपंचायतीचे माजी सदस्य बी. डी. कोतकर, महेश म्हस्के, सचिन कोतकर, प्रवीण झुगे यांच्यासह परिसरातील अनेक नागरिक उपस्थित होते. नागरिकांनी या रस्त्याची कायमस्वरूपी व दर्जेदार दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी केली.

# श्रीरामपूरकरांसमोर भीषण पाणीसंकट; आजपासून दिवसाआड पाणीपुरवठा

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

जलसंपदा विभागाकडून आवर्तन सुटण्याची अनिश्चितता असल्याने श्रीरामपूर नगरपालिकेकडून आजपासून दिवसाआड पाणीपुरवठा केला जाणार आहे. पालिकेच्या इतिहासात अशा प्रकारची घटना ही पहिल्यांदाच घडली आहे. सद्यस्थितीत पालिकेच्या साठवण तलावात जेमतेम पंधरा दिवस पुरेल इतकेच पाणी शिल्लक आहे. शिल्लक पाणी नागरिकांना आवर्तन सुटेपर्यंत पुरविणे क्रमप्राप्त आहे. आवर्तन सुटण्याची अनिश्चितता असल्यामुळे पालिकेने हा निर्णय घेतला. सद्यस्थितीत निवडणुकीची धामधूम तसेच आचारसंहिता ही चालू आहे. कालवा सल्लागार समितीची बैठक अद्यापही झाली नसल्यामुळे श्रीरामपूरच्या नागरिकांपुढे मोठे पाणीसंकट उभे राहिले.

राधाकृष्ण विखे हे जलसंपदा मंत्री आहेत. आवर्तन सोडण्याचे आदेश विखेंनी दिलेच तर श्रीरामपूरकरांच्या पाणीटंचाईला तोंड द्यावे लागणार नाही. श्रीरामपूर नगरपालिकेकडून कालवा सल्लागार समितीसह इतरांनाही पाणी सोडण्या संदर्भात पत्रव्यवहार करण्यात आला आहे. आमदार हेमंत ओगले यांनीही कालवा सल्लागार समितीस आवर्तन सोडण्यासंदर्भात सूचना केल्या. दरम्यान, उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप आणि प्रशासक किरण सावंत पाटील यांनी केले.

शेतीचे पाण्याचे आवर्तन जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सुटण्याची शक्यता असून तोपर्यंत शहरातील नागरिकांना पाण्यासाठी झगडावे लागणार आहे. पाण्याच्या अचानक उदभवलेल्या या संकटामुळे नागरिक हवालदिल झाले आहेत.



# महिला व्यवसाय प्रशिक्षण शिबिर उत्साहात

**कोपरगाव । किसन पवार**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत कोपरगाव तालुक्यातील चांदेकसारे ग्रामपंचायतीच्या वतीने महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आयोजित करण्यात आलेले महिला व्यवसाय प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न झाले. हे शिबिर ता. १७ व १८ डिसेंबर रोजी पार पडले. शिबिरामध्ये महिलांना विविध प्रकारचे मसाले तयार करणे तसेच दुग्धजन्य पदार्थ निर्मितीचे सखोल प्रशिक्षण देण्यात आले. ग्रामविकास अधिकारी संजय दुशिंग यांनी माहिती देताना सांगितले की, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या संकल्पनेतून व गटविकास अधिकारी संदीप दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली १५व्या वित्त आयोगाच्या निधीतून हे प्रशिक्षण आयोजित केले होते. ग्रामीण भागातील महिलांनी केवळ चूल आणि मूल यामध्ये अडकून न राहता स्वतः प्रशिक्षित होऊन उद्योग-व्यवसाय सुरू करावेत. बचत गटांच्या माध्यमातून उत्पादन निर्मिती करून आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. शिबिरादरम्यान गटविकास अधिकारी संदीप दळवी यांनी प्रत्यक्ष भेट देऊन उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. या प्रशिक्षण शिबिरात महिलांनी स्वतः प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून १२ प्रकारचे मसाले व १० प्रकारचे दुग्धजन्य पदार्थ तयार करून प्रशिक्षण घेतले. शिबिरास चांदेकसारे गावातील महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. याप्रसंगी सरपंच किरण होन, उपसरपंच वसिम शेख, माजी उपसरपंच सचिन होन, अशोक होन, ग्रामपंचायत सदस्य विश्वनाथ सोळसे, रेखा गायकवाड, सुनीता खरात तसेच श्रीराम शैक्षणिक विकास संस्थेचे प्रशिक्षक लक्ष्मीकांत होळकर व नंदिनी होळकर उपस्थित होते. शिबिर यशस्वी होण्यासाठी ग्रामपंचायत कर्मचारी मलू होन, अर्जुन होन, पोपट आल्हाट, ओंकार आहेर, प्रियांका रोकडे, वंदना जाधव व प्रमिला भालेराव यांनी मोलाचे सहकार्य केले. प्रास्ताविक वंदना जाधव यांनी केले, तर उपस्थितांचे आभार माजी उपसरपंच सचिन होन यांनी मानले.

# मुजफ्फर शेख यांना उपनगराध्यक्ष पद मिळण्याचे संकेत

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

पालिकेचे नवनिर्वाचित जेष्ठ नगरसेवक मुजफ्फर शेख यांना उपनगराध्यक्ष पद मिळण्याचे संकेत आहेत. निष्ठा आणि स्वाभिमान असलेल्या शेख यांना नूतन नगराध्यक्ष करण ससाणे आणि त्यांचे कुटुंबीय अत्यंत जवळचे मानतात. ससाणे कुटुंबियांचा शेख यांच्यावर पूर्ण विश्वास आहे. सन १९९५ पासून तर आजतागायत मुजफ्फर शेख हे काँग्रेस पक्षाशी म्हणजेच ससाणे कुटुंबीयांशी आजपर्यंत प्रामाणिक आहेत. स्व. जयंत ससाणे, माजी नगराध्यक्षा राजश्री ससाणे यांच्या कार्यकाळात ही शेख हे उपनगराध्यक्ष सह इतरही आरोग्य, पाणीपुरवठा, शिक्षण अशा वेगवेगळया समित्यांवर कार्यरत होते. स्व. ससाणे यांना नगराध्यक्ष, आमदार करेपर्यंत त्यांच्या खांद्याला खांदा लावून आणि आजही ते नगराध्यक्ष करण यांच्या पाठीशी भक्कम उभे आहेत. स्वाभिमान आणि निष्ठेची पावती म्हणून मुजफ्फर शेख यांना पहिल्याच टर्ममध्ये थेट उपनगराध्यक्ष पद मिळेल अशी शहरात चर्चा आहे. स्व. ससाणे, करण ससाणे तसेच मुजफ्फर शेख यांच्या राजकीय कारकिर्दीत अनेक चढउतार आलेत. मात्र हे दोघे कुटुंबीय एकमेकांपासून कधीच दूर गेले नाहीत. गेल्या ९ पूर्वी नगरपालिकेच्या झालेल्या निवडणुकीत मुजफ्फर शेख यांचा निसटता पराभव होऊनही ससाणे यांनी तत्कालीन नगराध्यक्ष अनुराधा अधिक यांच्या कार्यकाळात अत्यंत विश्वासू म्हणून स्वीकृत नगरसेवक पदावर घेत पालिकेत काम करण्याची संधी शेख यांना उपलब्ध करून दिली होती. आजमितीस करण ससाणेंबरोबर असलेल्या अनेकांनी त्यांना सोडचिठ्ठी देत इतरत्र राजकारण केले; मात्र राजकीय काळोखातही ससाणेंच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत शेख यांनी आपली निष्ठा जपली. शेख यांनी ससाणे यांच्याकडे आजपर्यंत कधीच काहीच मागितले नाही. मात्र योग्यवेळी शेख यांना वेळोवेळी ससाणे यांनी संधी उपलब्ध करुन देत काम करण्याची प्रेरणा दिली.

**शेख यांना या निष्ठेची पावती म्हणून आता पालिकेचे उपनगराध्यक्ष पद मिळण्याची संधी निर्माण झाली आहे. नवनिर्वाचित नगराध्यक्ष करण ससाणे मुजफ्फर शेख यांच्या राजकारणातील गाढ्या अभ्यासाचा पालिकेसाठी निश्चितच उपयोग करून घेतील, अशी ही मतदारांमध्ये चर्चा आहे.**





# विद्यार्थ्यांनी नव्या तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून ज्ञानसंपादन करावे- डॉ. सोनवणे

## सोनवणे यांच्याकडून शाहू विद्यालयास इंटरॲक्टिव्ह बोर्ड भेट

**राहुरी । राहुल जाधव**

श्री शाहू विद्यालयास आधुनिक शिक्षणाच्या दृष्टीने अहिल्यानगर येथील प्रसिद्ध कॅन्सर तज्ञ व खडांबे गावचे भूषण डॉ. सोनवणे यांच्या वतीने इंटरॲक्टिव्ह स्मार्ट बोर्ड भेट देण्यात आला. या उपक्रमामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना डिजिटल व तंत्रज्ञानाधारित शिक्षणाची प्रभावी संधी उपलब्ध होणार आहे. शनिवार, ता. २० डिसेंबर रोजी डॉ. सोनवणे यांनी उपलब्ध करून दिलेल्या सुमारे एक लाख दहा हजार रुपये किमतीच्या स्मार्ट बोर्डचे उद्घाटन श्री शाहू विद्यालयात संपन्न झाले. या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सदस्य दीपक दरे होते. विद्यालयाचे प्राचार्य रायते व पर्यवेक्षक शिंदे यांनी डॉ. सोनवणे यांच्याशी चर्चा केल्यानंतर त्यांनी तात्काळ विद्यार्थ्यांसाठी हा स्मार्ट बोर्ड उपलब्ध करून दिला. उद्घाटनप्रसंगी दीपक दरे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांकडे लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन करत स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शन केले. कार्यक्रमावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. सोनवणे यांनी विद्यार्थ्यांनी नव्या तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून ज्ञानसंपादन करावे, असे मार्गदर्शन केले. इंटरॲक्टिव्ह बोर्डच्या माध्यमातून अध्यापन अधिक सोपे, रोचक व प्रभावी होणार असून विशेषतः गणित व विज्ञान विषय समजण्यास मोठी मदत होईल, असे मत शिक्षकांनी व्यक्त केले. विद्यालयाच्या वतीने डॉ. सोनवणे यांचे आभार मानण्यात आले. याच कार्यक्रमात माजी विद्यार्थी संघाच्या वतीने शाहू विद्यामंदिरच्या प्रांगणामध्ये पेव्हिंग ब्लॉक बसवून देण्याची घोषणा करण्यात आली. या कार्यक्रमास पंचायत समितीचे माजी सभापती बाळासाहेब लटके, कृषीभूषण सरसिंग पवार, माजी सरपंच प्रभाकर हरिश्चंद्रे, माजी सरपंच यशवंत ताकटे, बाळासाहेब जठार, भरत पवार, गुलाब पवार, राजकुमार पवार, अर्जुन खळेकर, जॉनी पवार, सरपंच अण्णा माळी यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

# गणित-विज्ञान प्रदर्शनात अगस्ती विद्यालय सर्वोत्तम

**अकोले । सतीश पाचपुते**

श्री अगस्ती एज्युकेशन सोसायटी संचलित अगस्ती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अकोले यांनी ५३व्या तालुकास्तरीय गणितविज्ञान प्रदर्शनात सर्वच गटांत उल्लेखनीय यश संपादन करत मानाचा फिरता चषक पटकावला. मॉडर्न हायस्कूल, अकोले येथे तीन दिवस चाललेल्या या तालुकास्तरीय गणितविज्ञान प्रदर्शनात मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून आपली सर्जनशीलता व वैज्ञानिक दृष्टिकोन सादर केला.

या प्रदर्शनात अगस्ती विद्यालयाने गणित व विज्ञान विभागातील विविध गटांत प्रथम क्रमांक, तर विज्ञान विभागात द्वितीय क्रमांक मिळवत एकूण तीन पुरस्कार पटकावले आणि फिरता चषक आपल्या नावावर केला. विज्ञान विभागाच्या उच्च प्राथमिक गटात आराध्या रविंद्र नाईकवाडी हिने 'स्मार्ट टॉयलेट' ही संकल्पना सादर करून तालुक्यात द्वितीय क्रमांक मिळविला. दुर्गंधीमुक्त स्वच्छतागृह व पाण्याची बचत कशी साध्य करता येते, हे तिने आपल्या उपकरणाद्वारे प्रभावीपणे स्पष्ट केले. उच्च माध्यमिक गटातील गणित विभागात श्रद्धा महेश पंडित हिने 'गोल्डन रेशो (फिबोनाची सिरीज)' या संकल्पनेद्वारे प्रथम क्रमांक मिळविला.



ही संकल्पना गणितासह निसर्ग, कला, अर्थशास्त्र, वैद्यकीय व संगणक विज्ञानात कशी उपयुक्त आहे, हे तिने स्पष्ट केले. संस्थेचे संस्थापक बा. ह. नाईकवाडी (बाबा) व माजी सेक्रेटरी दुर्गाबाई नाईकवाडी यांनी विज्ञान व तंत्रज्ञानाला नेहमीच प्रोत्साहन दिले आहे. या यशाबद्दल सेक्रेटरी शैलजा पोखरकर, कार्याध्यक्ष शिरीष नाईकवाडी, सतीश नाईकवाडी, संदीप नाईकवाडी, प्राचार्य मंगेश खांबेकर, उपमुख्याध्यापक तात्यासाहेब दौंड, पर्यवेक्षक नंदा गोपाळे तसेच शिक्षक-पालक संघ व पालकवर्ग यांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षक महेश पंडित, अनिल दाते, कांचन वाकचौरे व नीरज वाळुंज यांचे अभिनंदन केले.

**विज्ञान विभागाच्या उच्च माध्यमिक गटात आर्या विजय गुजर हिने 'राईड सेफ २.०' या नावीन्यपूर्ण प्रकल्पासह प्रथम क्रमांक पटकावला. स्मार्ट हेल्मेटमध्ये बसविलेल्या अल्कोहोल डिटेक्शन सेन्सरद्वारे मद्यपान केले असल्यास वाहनाचे इंजिन बंद होते, तसेच हेल्मेटशिवाय वाहन सुरू होत नाही, या वैशिष्ट्यांमुळे हा प्रकल्प रस्ते अपघात रोखण्यासाठी उपयुक्त ठरू शकतो, असे परीक्षकांनी नमूद केले.**

# आर्थिक उदारीकरणाचे जनक : पी.व्ही.नरसिंहराव

भारताचे माजी पंतप्रधान, नवीन आर्थिक धोरणांची सुरवात करणारे, विद्वान व्यक्तिमत्व पी व्ही नरसिंहराव यांची आज पुण्यतिथी. २८ जून १९२१ रोजी आंध्रप्रदेशातील करीमनगर जिल्ह्यातील वंगारा या गावात त्यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण उस्मानिया विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि नागपूर विद्यापीठ येथे झाले. मातृभाषा तेलगूबरोबरच हिंदी, इंग्रजी, मराठी, कन्नड यासारख्या दहा भाषांसह सहा विदेशी भाषा देखील त्यांना अवगत होत्या. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात आणि हैदराबाद मुक्ती संग्रामात भाग घेतला. १९३५ साली हैदराबादच्या निजामाने विद्यापीठात वंदे मातरम हे गीत गण्यास बंदी घालून निजामाचे गौरव करणारे गीत गाण्याचा आदेश दिला होता तेव्हा विद्यार्थी दशेतील नरसिंहराव यांनी त्याला कडाडून विरोध केला. १९६२ साली ते पहिल्यांदा केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री बनले. १९७१ सालापर्यंत ते केंद्रात मंत्री होते. या दरम्यान त्यांनी गृह, परराष्ट्र आणि संरक्षण यासारखी महत्वाची खाती सांभाळली. १९७१ ते १९७३ या काळात ते आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात भूमी सुधारणा लागू करणारे आंध्रप्रदेश हे भारतातले पहिले राज्य बनले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे अनेक दिग्गज नेते पराभूत झाले पण नरसिंहराव विजयी झाले. १९८४ व १९८९ ची लोकसभा निवडणूक त्यांनी महाराष्ट्रातील रामटेक मतदारसंघातून लढवली व जिंकली. १९९१ साली राजीव गांधी यांच्या हत्येनंतर ते काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष बनले. लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यावर त्यांची पंतप्रधान म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. पंतप्रधान बनल्यावर देशाची विस्कटलेली आर्थिक घडी सांभाळण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. त्यांनी मनमोहन सिंग यांची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. मनमोहन सिंग हे निष्णात अर्थतज्ज्ञ होते. नरसिंहराव, मनमोहन सिंग जोडीने आधीच्या सरकारचे सर्व निर्णय बाजूला ठेवून आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. ज्यावेळी अतिशय गंभीर आर्थिक संकटातून देश सावरला त्यावेळी नरसिंहराव यांना फादर ऑफ इंडियन इकॉनॉमिक रिफॉर्म्स असे म्हटले जाऊ लागले. यासाठी १९९४ साली मनमोहन सिंग यांना युरोमनीने सर्वोत्तम अर्थमंत्र्यांच्या पुरस्काराने गौरविण्यात आले तेंव्हा त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की याचे खरे श्रेय नरसिंहराव यांना दिले गेले पाहिजे. नरसिंहराव सरकारने १९९२ सालच्या अर्थसंकल्पात परकीय गुंतवणुकीला पोषक धोरण आणले त्यामुळे शेअर बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले. मोठ्या प्रमाणावर तोट्यात असलेल्या सरकारी संस्थांचे पुनर्जीवन करण्यासाठी खाजगीकरणाची सुरवात नरसिंहराव यांनी केली तर सेबी अर्थात सिक्युरिटी एक्सचेंज बोर्ड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंजची सुरवात देखील त्यांनीच केली. देशाच्या विकासाला गती देण्यासाठी त्यांनी खासदार निधीची सुरवात केली. सत्तेवर आल्यावर त्यांनी पंजाबमध्ये निवडणुका घेतल्या या निवडणुकीनंतर बियांत सिंग हे पंजाबचे मुख्यमंत्री बनले. त्या सरकारने दहशतवादाविरुद्ध कठोर पावले उचलून राज्यात शांतता प्रस्थापित केली. पंजाबमधील दहशतवादाचे उच्चाटन करण्यामध्ये आणि फुटीरतावादी चळवळीला क्षीण करण्यामध्ये नरसिंहराव यांनी त्यांच्या खंबीर निर्धाराचे दर्शन घडवले. नरसिंहराव म्हणायचे जग बदलले आहे, देशात देखील बदल झाले पाहिजेत. आपल्या याच सिद्धांताला सोबत घेऊन भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवा आकार देत त्यांनी आग्नेय आशिआई देशांसोबत मैत्रीचा प्रारंभ लूक ईस्ट या धोरणाने केला. सत्तेवर असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने १९९८ सालच्या निवडणुकीत काँग्रेसने त्यांना उमेदवारी नाकारली त्यामुळे त्यांनी राजकारण संन्यास घेतला. त्यांच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप न्यायालयात सिद्ध होऊ शकले नाहीत. २३ डिसेंबर २००४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
समाजसंवाद

# बुधवारी ‘सफर ए रफी’ संगीत मैफल

**अहमदनगर । आबीद खान**

हिंदी चित्रपटसृष्टीतील अजरामर पार्श्वगायक मोहम्मद रफी यांच्या १०१व्या जयंतीनिमित्त तसेच सुप्रसिद्ध अभिनेते धर्मेंद्र यांच्या ९०व्या जयंतीचे औचित्य साधून ‘सफर-ए-रफी : धर्मेंद्र जी के संग’ या विशेष संगीत मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती आयोजक सईद खान यांनी दिली. या संगीत मैफलीत मोहम्मद रफी यांनी गायलेली अजरामर गीते तसेच धर्मेंद्र यांच्या चित्रपटांतील लोकप्रिय गीतांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. रफी यांच्या मधुर आवाजातील सदाबहार गाणी आणि धर्मेंद्र यांच्या अभिनयाने अजरामर झालेल्या चित्रपटसंगीताचा सुरेल प्रवास या मैफलीत रसिकांना अनुभवता येणार आहे. या कार्यक्रमात ज्येष्ठ व नवोदित गायक सईद खान, विधा तन्वर, अंजुम पटवेकर, अन्वर शेख, अन्सार शेख, संजय भिंगारदिवे, आबीद हुसेन, निलेश महाजन, प्रशांत छजलानी आणि मुख्तार शेख हे कलाकार गीतांचे सादरीकरण करणार आहेत. विविध गायकांच्या आवाजातून रफी यांची गाणी आणि धर्मेंद्र यांच्या चित्रपटातील गीते सादर होणार असल्याने संगीतप्रेमींमध्ये या कार्यक्रमाबाबत विशेष उत्सुकता निर्माण झाली आहे. ही संगीत मैफल बुधवार, ता. २४ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता रहेमत सुलतान हॉल, सर्जे पुरा, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य असून संगीतप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या अविस्मरणीय संगीत प्रवासाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजक सईद खान यांनी केले आहे.

# सांस्कृतिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या लावण्यवतींचा सन्मान

## पवळा हिवरगावकर, विठाबाई नारायणगावकर यांच्या स्मृतींचा जागर

**मुंबई । नितीनचंद्र भालेराव**

महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव जपणाऱ्या, मनोरंजनातून समाजप्रबोधन करणाऱ्या आणि ऐतिहासिक सांस्कृतिक वारसा टिकवून ठेवणाऱ्या लावण्यवतींचा सन्मान करण्यात येणार आहे. अद्वैत थिएटर्स आणि काली बिल्ली प्रोडक्शन यांच्या संयुक्त विद्यमाने ‘महाराष्ट्राची लावण्यवती पुरस्कार २०२५’ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून हा कार्यक्रम बुधवार, ता. २४ डिसेंबर रोजी दुपारी ४ ते सायंकाळी ७ या वेळेत पु. ल. देशपांडे मिनी ऑडिटोरियम, रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई येथे होणार आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात मोलाचे योगदान देणाऱ्या आणि तमाशा कलाक्षेत्रात आद्यप्रवर्तक ठरलेल्या आद्यनृत्यांगणा पवळा भालेराव हिवरगावकर तसेच महाराष्ट्राची लोककला देशाच्या सीमेपर्यंत पोहोचविणाऱ्या राष्ट्रपती पदक विजेत्या विठाबाई नारायणगावकर यांच्या स्मृतींचा जागर या पुरस्कार सोहळ्याच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. याचबरोबर लावण्य सम्राज्ञी व अभ्यासक रेश्मा मुसळेपरितेकर यांच्या उपस्थितीत पवळा भालेराव हिवरगावकर आणि विठाबाई नारायणगावकर यांच्या कलेचा व





स्मृतींचा वारसा जपणाऱ्या कुटुंबीयांचा पारितोषिक देऊन सन्मान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास ॲड. आशाताई लांडगे (माजी सदस्य, महिला आयोग महाराष्ट्र), शिल्पा पनाड (मुख्य कार्यकारी अधिकारी, न्यूज २४७) यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय लेखिका प्रा. शैलजा पाईक यांनी ‘The Vulgarity of Caste: Dalit, Sexuality and Humanity in Modern India’ (२०२२) या अभ्यासग्रंथातून महाराष्ट्रातील जात, वर्ग, लिंग, लैंगिकता आणि लोकप्रिय संस्कृतीतील राजकारणाचे सखोल विश्लेषण केले आहे. या ग्रंथामध्ये आद्यनृत्यांगणा नामचंद पवळा भालेराव हिवरगावकर, राष्ट्रपती पदक विजेत्या विठाबाई नारायणगावकर, कांताबाई सातारकर आणि सुरेखा पुणेकर यांसारख्या महान महिला कलावंतांच्या ऐतिहासिक योगदानाचे आंतरराष्ट्रीय पातळीवर पुनर्मूल्यांकन करण्यात आले आहे. या कार्यासाठी प्रा. शैलजा पाईक यांना मॅकआर्थर फाउंडेशनची २०२४ सालची ‘जीनियस’ फेलोशिप मिळाली आहे. याच विचारधारेतून अद्वैत थिएटर्स आणि काली बिल्ली प्रोडक्शन यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्राच्या कलासंस्कृतीत मोलाचे योगदान देणाऱ्या महान कलावंतांच्या स्मृती जागवून त्यांच्या वारसांचा सन्मान करण्याचा हा उपक्रम राबविण्यात येत आहे. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे स्वीय सहाय्यक प्रवीण मोरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या पुढाकारातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत जनजागृती व प्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यात प्रवीण मोरे नेहमीच सक्रिय असल्याची माहिती रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेश उपाध्यक्ष तसेच पवळा कला मंचाचे अध्यक्ष श्रीकांत भालेराव यांनी दिली.

# सीएसआरडीच्या शुभमची राज्यस्तरावर दणदणीत कामगिरी

**अहमदनगर । रयत समाचार**

भारतीय युवा खेल परिषद अंतर्गत महाराष्ट्र राज्य युवा खेल परिषद आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत भा.पां. हिवाळे शिक्षण संस्थेच्या सीएसआरडीचा एमएसडब्ल्यू द्वितीय वर्षाचा विद्यार्थी शुभम सीमा अरुण हंबीरराव याने २०० मीटर व ८०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत दुहेरी सुवर्णपदक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. या राज्यस्तरीय स्पर्धेत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. ही स्पर्धा सिंहगड इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग, सोलापूर येथे उत्साहात पार पडली. महाराष्ट्र राज्य युवा खेल परिषदचे संचालक शंकर गायकवाड पाटील यांच्या हस्ते विजेत्यांना ट्रॉफी व पदक प्रदान करण्यात आले.. शुभम हंबीरराव हा अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील हळगाव येथील शेतकरी कुटुंबातील आहे. आई-वडील, आजी-आजोबा, चुलता-चुलती व त्यांची मुले असे एकत्र कुटुंबात राहात कठोर परिश्रम व सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर शुभमने हे यश मिळवले. शुभमच्या उज्ज्वल यशाबद्दल सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे, सर्व प्राध्यापकवर्ग तसेच बीजेएमसी व एमएसडब्ल्यूचे विद्यार्थी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. राज्यस्तरावर मिळवलेल्या या यशामुळे शुभमचे सर्वत्र कौतुक होत असून, सीएसआरडीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.



# दहावीबारावीनंतर योग्य दिशा निवडण्यासाठी मार्गदर्शन आवश्यक-डॉ. लाहोरी

## इकरा एज्युकेशन सोसायटीकडून करिअर गाईडन्स

**अहमदनगर । आबीद खान**

दहावी व बारावीनंतर केवळ गुणांच्या आधारे नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या आवड, क्षमता व कौशल्यांचा विचार करून करिअरची निवड करणे गरजेचे आहे. आज शिक्षणासोबत कौशल्य विकासालाही तितकेच महत्त्व असून वैद्यकीय, अभियांत्रिकी, कला, वाणिज्य, विज्ञान, तांत्रिक शिक्षण, व्यावसायिक अभ्यासक्रम, स्पर्धा परीक्षा तसेच स्वयंरोजगाराच्या संधी विद्यार्थ्यांसाठी खुल्या आहेत.

योग्य माहिती व मार्गदर्शन मिळाल्यास विद्यार्थी यशस्वी वाटचाल करू शकतात, असे प्रतिपादन डॉ. पी. ए. इनामदार युनिव्हर्सिटीचे उपकुलपती डॉ. एम. ए. लाहोरी यांनी केले. इकरा एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीच्या वतीने दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण व करिअर निवडीसाठी मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने आयोजित करण्यात



आलेला करिअर मार्गदर्शन कार्यक्रम पी. ए. इनामदार इंग्रजी स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, मौलाना आझाद उर्दू हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज, अहमदनगर उर्दू हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज, मातोश्री उर्दू हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज तसेच अहमदनगर हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज येथे उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात पुणे येथील डॉ. पी. ए. इनामदार युनिव्हर्सिटीचे उपकुलपती डॉ. एम. ए. लाहोरी, कार्यालय अधीक्षक अकील शेख, सहाय्यक प्राचार्य ए. आर. विनीश देसाई, सहाय्यक प्राचार्य अफान खान, प्लेसमेंट ट्रेनिंग ऑफिसर ताहीर खान तसेच संचालक डॉ. एजाज शेख यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांना त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली. यावेळी इकरा एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीचे उपाध्यक्ष इंजि. इकबाल सय्यद, सचिव विकार काझी, प्राचार्य युनुस सलीम, प्राचार्या फरहाना शेख, प्राचार्य मुन्नवर हुसेन, प्राचार्य जमीर शेख, प्राचार्या शाहीदा आदी मान्यवर उपस्थित होते. सहाय्यक प्राचार्य अफान खान यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अपयशाची भीती न बाळगता सातत्य, मेहनत व सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचा सल्ला दिला. पालकांनीही मुलांवर अनावश्यक दबाव न टाकता त्यांच्या निर्णयांना पाठबळ द्यावे, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या शेवटी शंकासमाधान सत्रात विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना तज्ज्ञांनी सविस्तर उत्तरे दिली. या करिअर मार्गदर्शन कार्यक्रमामुळे पुढील शिक्षण व करिअर निवडीसाठी स्पष्ट दिशा मिळाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

# प्रतिगामी विचारसरणीला श्रीरामपूरकरांची चपराक

श्रीरामपूर नगरपालिकेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे करण ससाणे यांनी नगराध्यक्ष पदाची निवडणूक जिंकून शहरांमध्ये पुन्हा एकदा माजी आमदार जयंत ससाणे यांनी जी यंत्रणा बांधली होती. त्या यंत्रणेच्या जोरावर दैदिप्यमान यश संपादन केले. त्यांच्या विजयाने श्रीरामपूरकरांना शांतता, सलोखा, विकास हवा या बाबी प्रकर्षाने जाणवल्या.

मागील काही वर्षांमध्ये श्रीरामपूर शहराचे वातावरण बिघडवून टाकण्याचा प्रयत्न काही समाजविरोधी प्रवृत्तींनी केला. विशेषतः शहराची विभागणी हिंदू मुस्लिमांमध्ये करून नको ते विषय निर्माण करून शहराचे वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न केला गेला. वास्तविक पाहता श्रीरामपूर शहरांमध्ये कोणत्याही एका विशिष्ट जाती किंवा समाजाचे प्राबल्य नाही. अठरा पगड जातीची माणसं गुण्या गोविंदाने या शहरात राहतात. सर्वांचे व्यवसाय एकमेकांवर अवलंबून आहेत. सर्वांचे एकमेकांशी अतिशय चांगले संबंध आहेत. प्रत्येकाच्या सुखदुःखामध्ये जाती धर्माच्या भिंती ओलांडून माणसं सहभागी होतात. परंतु काहींनी मागील काही दिवसांमध्ये फक्त हिंदुत्व आणि मुस्लिम विरोध हे मुद्दे घेऊन शहराचे वातावरण खराब केले. दहशत माजविण्याचा देखील प्रयत्न केला. परंतु लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीमध्ये या सर्व प्रकारांना कोणताही थारा न देता मतदारांनी भाऊसाहेब वाकचौरे यांना खासदारकी आणि हेमंत ओगले यांना आमदारकी बहाल केली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या नावाने गेली पंधरा-वीस वर्षे राजकारण करण्याचा प्रयत्न देखील झाला. नगरपालिका किंवा विधानसभेची निवडणूक आली कि या पुतळ्याचा विषय हमखास काढला जायचा. परंतु जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी या सर्व प्रश्नांचा सखोल अभ्यास करून हा पुतळा शिवाजी चौकातच नेहरू मार्केट जवळ बसवला आणि हा विषय कायमचा निकाली काढला. विशेष म्हणजे नगरपालिकेची निवडणूक डोळ्यासमोर ठेवून हा पुतळा बसवल्यानंतरही यावर राजकारण झाले. पण ते फारसे यशस्वी झाले नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला शहरातील मुस्लिम समाजाच्या कोणत्याही व्यक्तीने कधी विरोध केला नाही. परंतु याबाबत सातत्याने मुस्लिम समाजाची बदनामी करण्याचे प्रयत्न देखील सातत्याने झाले. परंतु एक गोष्ट कालच्या निवडणुकीच्या निकालाने स्पष्ट केली कि



श्रीरामपूरकर खूप सुज्ञ आहेत. चांगलं काय आणि वाईट काय आहे हे त्यांना चांगलं कळतं. म्हणूनच जनतेचा कौल हा काँग्रेस पक्ष आणि करण ससाणे यांच्या बाजूने लागला. ससाणे यांना जे मतदान झाले आहेत ते एकूण झालेल्या मतदानाच्या ४६% आहे. त्या खालोखाल भाजपाचे श्रीनिवास बिहाणी यांना ते ३३ टक्के मते मिळाली आहेत तर भाजपमध्ये पूर्ण हयात व्यतीत करणारे व पक्षांतर्गत गटबाजीमुळे ज्यांना भाजप सोडावा लागला असे शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार प्रकाश अण्णा चित्ते यांना १५ टक्के मते मिळाली. विशेष बाब म्हणजे प्रकाश चित्ते यांचे मुस्लिम समाजातील अनेक मित्र आहेत. परंतु निवडणुकीमध्ये मुस्लिम समाजाला विरोध करणे हे त्यांच्या राजकारणाची एक नीती आहे. त्यामुळे ते फारसे यशस्वी होऊ शकलेले नाहीत. एक लढवय्या कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख आहे. श्रीरामपूर मध्ये भाजपा वाढवण्यामध्ये त्याचा सिंहाचा वाटा. परंतु हे करताना त्यांनी मुस्लिम द्वेषाची कास धरल्यामुळे ते नगरपालिकेमध्ये आजपर्यंत यशस्वी होऊ शकले नाहीत. जिल्ह्यात इतर ठिकाणी देखील मुस्लिम समाज मोठ्या संख्येने भाजपासोबत आहे. परंतु श्रीरामपूरमध्ये मुस्लिम समाजाला भाजपपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न सातत्याने केला गेल्याने शहरात देखील आता मतदारांची विभागणी झाली. करण ससाणे यांना मिळालेल्या मतांवर जर नजर टाकली तर असे दिसून येते कि रेल्वे लाईनच्या अलीकडे संपूर्ण वार्ड नंबर दोन, गोंधवणी परिसर, वार्ड नंबर एक या जवळजवळ अर्धे शहर असणाऱ्या परिसरात आठ प्रभागातून १६ पैकी १५ जागावर काँग्रेस पक्षाचे नगरसेवक निवडून आलेले आहेत. एक अपक्ष आलेले अर्जुन दाभाडे हे देखील काँग्रेस बरोबर जातील अशी शक्यता आहे. रेल्वे अलीकडील भागातून करण ससाणे यांना २४७२४ मतांपैकी १५१०६ मते मिळाली आहेत तर रेल्वेच्या पलीकडे त्यांना ९ ते १७ या एकूण नऊ प्रभागातून ९६१८ मते मिळाली. या परिसरामध्ये भारतीय जनता पार्टीची ताकद दिसून येत आहे. विशेष बाब म्हणजे भारतीय जनता पक्षाकडून जे १० नगरसेवक निवडून आलेले आहेत. त्यातील पाच जण हे पूर्वाश्रमीचे काँग्रेसला मानणारे आहेत. आजही दररोज सकाळी मॉर्निंग वॉकला हे सर्व लोक एकत्र असतात. त्यामुळे काँग्रेस पक्षाची ताकद ही सर्वसामान्य श्रीरामपूरकरांवर अवलंबून आहे हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. या निवडणुकीच्या निमित्ताने ज्यांनी काँग्रेस सोडली त्यांना पराभव चाखावा लागला. अशी सुद्धा उदाहरणे आहेत. यामध्ये माजी उपनगराध्यक्ष रवींद्र गुलाटी व राजेश अलग यांच्या कुटुंबातील तीन लोक पराभूत झाले. माजी नगरसेवक शामलिंग शिंदे यांचे चिरंजीव रोहित शिंदे यांना देखील पराभव पत्करावा लागला. तर दुसरीकडे दुसऱ्या पक्षातून जे काँग्रेसमध्ये आले ते विजयी झाले. राजेंद्र पवार, रईस जहागीरदार ही मंडळी राष्ट्रवादीतून काँग्रेसमध्ये आली. त्यांना उमेदवारी देखील मिळाली आणि ते विजयी देखील झाले. त्यामुळे शहरांमध्ये काँग्रेसचा विचार मानणारी मंडळी आजही आहेत हे देखील दिसून आले.



सलीमखान पठाण
श्रीरामपूर प्रतिनिधी
९२२६४०८०८२
निवडणूक विश्लेषण